# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ८६ वा मंगळवार दि.०३ सप्टेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# भविष्यांना आकार अन विचाराने साकार करतात त्यांना पत्रकार म्हणतात

## शिवरत्न पुरस्कार मिळणे म्हणजे मोठा सन्मान होणे - ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले






लातूर – सार्वजनिक जीवन जगत असताना सामाजिक बांधिलकीने जगणे महत्त्वाचे असते एखाद्याची प्रगती होत असताना त्यांचा आनंद स्वतःला होणे हे खर्या संताचे लक्षण आहे यालाच संत म्हणतात आणि आज विलासराव देशमुख साहेबांच्या स्मृतिदिन व लातूर मिशन वृत्तपत्राच्या आकरावा वर्धापन दिना निमित्त शिवरत्न पुरस्कार वितरण व गुणगौरव समारंभ होत आहे प्रत्येकाचे सुख दुःख जाणून घेणे, त्यावर उपाय शोधणे हे विलासरावांचे खास वैशिष्ट्य होते समोरच्यांना न मागता देणारे मोठ्या मनाचे नेते होते असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले अध्यक्षीय भाषणात म्हणाले. अशा बर्याच गोष्टींना उजाळा दिला याबरोबरच गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यासोबत सुद्धा आलेला अनुभव सांगितला. या दोन लोकनेत्याच्या आठवणीना उजाळा दिला प्रत्येक विषयाला हात घालून आपल्या खुमासदार शैलीत मनोगत व्यक्त करून उपस्थितांचे दाद मिळविली. यावेळी विचार मंचावर उद्घाटक म्हणून खा.डॉ. शिवाजी काळगे, उपविभागीय अधिकारी रोहिणी नर्हे, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे तसेच प्रमुख उपस्थिती भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश सचिव ऋषिकेश कराड, राष्ट्रीय संत संदेश पक्षाचे अध्यक्ष राजेंद्र वनारसे, निवृत्त अभियंता सुनंदा जगताप लातूर मिशनचे संपादक भारत जाधव उपस्थित होते. यावेळी यांनीही आपले विचार मांडले या शिवरत्न पुरस्कार वितरण व गुणगौरव सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरानी उपस्थिती लावली होती तसेच महिला वर्गासह प्रशासनातील अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते अनाथ व गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून सामाजिक बांधिलकीची परंपरा वृत्तपत्राने जोपासली. सभागृह खचाखच भरलेले होते, संयोजकांना ऐनवेळी खुर्च्या वाढवाव्या लागल्या. लातूर मिशन वृत्तपत्र वर्धापन दिनाला भरभरून शुभेच्छा मिळाल्या. आजच्या काळात समाजातील प्रत्येक घटकाला शोधून सन्मानित करण्याची गरज –खा. डॉ शिवाजी काळगे . समाजामध्ये वावरत असताना प्रत्येकाने आपापल्या जबाबदारीने राहील्यास अराजकता माजणार नाही सर्वच घटकातील व्यक्तींना शोधून त्यांचा सन्मान करण्याची काळची गरज बनली आहे. यामुळे त्यांच्याकडुन आणखीन जबाबदारीने कार्य होते असे प्रतिपादन लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी यावेळी केले. विलासरावजी देशमुख गोपीनाथरावजी मुंडे साहेब एकच नाण्याच्या दोन बाजू – ऋषिकेश कराड प्रथम मीडियाच्या विचार मंचावर आमंत्रित करून बोलण्याची संधी दिली सर्व पुरस्कार प्राप्त त्याचे अभिनंदन करतो माझं जेवढे वय तेवढं त्याचे कार्य आहे लोकनेते विलासराव देशमुख साहेब गोपीनाथ मुंडे साहेब हे एकदाच जिल्हा परिषदेत सोबत एकदाच विधानभवनात तसेच दिल्लीत सुद्धा एकच वेळी जाणारे जिवलग मित्र होते असे चित्र आता महाराष्ट्रात पाहायला मिळणार नाही या दोन नेत्याची उंची खूप मोठी आहे आणि यांच्यावर मला बोलण्याची संधी या निमित्ताने मिळाली असे म्हणताच सभागृहात एकदम भावनिक वातावरण निर्माण झाले होते शिवरत्न पुरस्कार वितरण व गुणगौरव सोहळा प्रसंगी ऋषिकेश कराड यांनी या दोन्ही नेत्यांच्या कार्याला उजाळा दिला. साहेबांच्या निधनापासून त्यांचे कार्य व विचारावरचा हा शिवरत्न पुरस्कार सोहळा –राजेंद्र वनारसे गेल्या अकरा वर्षापासून नियमितपणे वर्धापन दिन व शिवरत्न पुरस्कार वितरण सोहळा आयोजित होतो विलासराव देशमुख साहेब यांच्या विचाराने प्रेरित होऊन हा कार्यक्रम दरवर्षी यशस्वी होतो. यामुळे या शिवरत्न पुरस्कार वितरण सोहळ्याचे महत्त्व खूप आगळे वेगळे आहे असे बरेच प्रसंग आपल्या भाषणात राष्ट्रीय संत संदेश पक्षाचे अध्यक्ष राजेंद्र वनारसे यांनी सांगितले. दरवर्षी अशाच चांगल्या रत्नांचा गुणगौरव व्हावा – सुनंदा जगताप एखादी व्यक्ती आपले प्रामाणिक कर्तव्य निभावते ते कार्य करत असताना त्याचा कुठेतरी सन्मान होतो त्या सन्मानाचे पावती म्हणून पुरस्कार मिळतो यामुळे त्याच्या पाठीवर कौतुकाचे थाप पडते यामुळे त्यांच्या आणखीन जबाबदारी वाढते याबरोबरच पर्यावरणाचा सुद्धा विचार करून समतोल राखणे गरजेचे आहे दररोज झाडाचे संगोपन करा असा मोलाचा सल्ला सुनंदा जगताप यांनी उपस्थितांना दिला. आपल्या कामाचे मूल्यमापन होत असते – भारत जाधव गेल्या अकरा वर्षापासून लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांचा स्मृतिदिन व लातूर मिशन वृत्तपत्राचा वर्धापन दिन एक आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो आतापर्यंत १०० व्यक्तींना पुरस्काराने गौरविण्यात आले आहे यामुळे समाजात व प्रशासनात काम करणार्या व्यक्तींना एक वेगळीच ऊर्जा मिळते याला भरभरून प्रतिसाद मिळतो समाजात काम करताना आपल्या कामाचे मूल्यमापन होत असते असे आपल्या भाषणात लातूर मिशनचे संपादक भारत जाधव म्हणाले. या वेळी सौ. मायाताई पाटील सरपंच ग्रामपंचायत नांदगाव, डॉ. पंजाब खानसोळे उपायुक्त मनपा लातूर, जगदिश कोकाटे विभागीय अभियंता रा.प.महामंडळ लातूर, हनुमंत बापू नागटिळक सामाजिक कार्य तथा उपसरपंच ग्रामपंचायत मुरूड, महेश हिप्परगे मंडळ अधिकारी कासारखेडा, ह.भ.प. सुनिल महाराज जवळे सांप्रदायिक क्षेत्र, अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त, राजन सरवदे गीतकार संगितकार कलाक्षेत्र, गोविंद महाके ग्रामसेवक ग्रामपंचायत शामनगर, विजयकुमार कावळे शैक्षणिक क्षेत्र जिजाऊ इंग्लीश स्कुल चिंचोली (ब.) सौ. संगिता बरूरे अध्यक्ष सखी महिला बचत गट लातूर पुरस्काराने मान्यवरांना उपस्थितीत गौरविण्यात आले तसेच मनाली पाटील, शेख बाशीद अव्वल कारकुन तहसील, गोविंद जगताप, महेश राठोड, दिपक बोराडे, दयानंद माने यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या वेळी उपसंपादक परमेश्वर घुटे, जिल्हा प्रतिनीधी गणेश स्वामी, सल्लागार – गणेश होळे, कैलास साळुंके, श्रीराम गायकवाड, गोविंद जगताप, दयानंद माने, कैलास ढोले, श्रीमंत होळे, विष्णु शिंदे, महेश राठोड, सादिक शेख, प्रा. बालाजी वाघमारे, उमेश भिसे, केदार वांगसकर, दिपक बोराडे पाटील, तुकाराम जोगदंड, ईश्वर बद्दर, अजित दुटाळ, बालाजी कांबळे, प्रदिप शिंदे, श्रीधर मसलकर, ओमकार सरडे, दयानंद स्वामी, बालाजी इगोले, अर्जुन लोखंडे, परमेश्वर माचवे, राजाभाऊ बोराडे, अमर जाधव, दयानंद लकडे, लखन सावंत, ऋषिकेश मोरे, मलबा, अलोक हासवले आदीं संयोजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अतिशय उत्कृष्ट पद्धतीने सूत्रसंचालन बालाजी कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन गणेश स्वामी यांनी मानले.






अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त यांना लातूर जिल्ह्यातील पत्रकार क्षेत्रातील नामांकित शिवरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल प.पूज्य भिकू पय्यानंद थेरो व त्यांचा भिकू संघ यांनी सत्कार केला. यावेळी रघुनाथ बनसोडे संपादक दैनिक लातूर प्रभात, ॲडवोकेट आनंद सोनवणे अध्यक्ष राजा शुद्धोधन चारिटेबल ट्रस्ट, सिद्धार्थ सूर्यवंशी जिल्हा अध्यक्ष, बहुजन समाज पार्टी लातूर आदी उपस्थित होते

# वकील संघाच्या उपस्थितित सामूहिक बुध्द वंदना संपन्न



लातूर :– पु. भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शना खाली होत असलेल्या दर रविवार चलो बुद्ध विहार या अभियाना अंतर्गत धम्मप्रचार मोहिमेला सशक्त करण्यासाठी लातूर शहरातील बौद्ध समाज विधिज्ञ संघ सहभागी झाले होते. ही सामूहिक वंदना १ सप्टेंबर २०२४ रोजी नांदेड रोड स्थित राजा शुद्धोधन बुद्ध विहार संपन्न झाली. तत्पूर्वी सर्व विधीज्ञ संघाच्या वतीने तथा पु. भिक्खु संघाच्या वतीने महामानवांच्या प्रतिमेला पुष्पाने,धुपाने तथा दीपाने अभिवादन करण्यात आले. त्रिरत्न वंदना नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली बौद्ध धर्माची आचारसंहिता म्हणेजच बावीस प्रतिज्ञा व संविधान प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन ही करण्यात आले. या वेळी धम्मदेसना देतांना पु. भिक्खु पय्यानंद थेरो म्हणाले कि समाजावर होत असलेले विविध प्रकारे जे अत्याचार होत आहेत, या अत्याचाराला न्यायालयामध्ये अशा प्रकरनाची भक्कमपणे बाजू विधिज्ञ संघ मांडत असतो. व बहुतेक वेळा संघ असे प्रकरण विनामूल्य लढत असतो. निश्चितच ही स्तुत्य तसेच अभिनंदनिय या बाब असल्याचे विधीज्ञ संघा प्रति गौरवउद्गार काढले. तसेच समाजातील दिवसेंदिवस अत्याचाराची मालिका थांबवायची असेल तर बुद्धिजीवी वर्गाने धम्म प्रचार आणि प्रसार करण्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी झाले पाहिजे तथा सर्वांनी बुद्ध धर्म आचरणात आणावाच लागेल असेही प्रतिपादन या वेळी केले.यावेळी भंते बुध्दशील, भंते बोधीराज हे देखील उपस्थित होते. तदनंतर सर्व विधीज्ञ संघाचा महाविहार धम्मसेवक ग्रुपच्या वतीने, राजा शुद्धोधन बुद्ध विहार ट्रस्ट च्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच या वेळी पत्रकारितेच्या क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल शिवरत्न पुरस्कार प्राप्त अशोक हाणवते, तर रघुनाथ बनसोडे यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर ॲडव्होकेट फोरम चे अध्यक्ष ॲड.लहू सुरवसे,ॲड.गणेश मधुकर कांबळे, ॲड. दीपक माने,ॲड यशवंत चव्हाण फोरमचे सल्लागार ॲड.शिवकुमार बनसोडे, ॲड. राजकुमार गंडले, ॲड. दीपक साठे प्रसिद्धी प्रमुख ॲड. कृष्णा कांबळे तसेच सन्माननीय सदस्य ॲड. सुभेदार मादळे,ॲड. रोहित सोमवंशी, ॲड.रमेश गायकवाड, ॲड. सचिन दुर्गादास कांबळे व राजाशुद्धोधन चॅरिटेबल ट्रस्ट चे अध्यक्ष ॲड आनंदजी सोनवणे व पदाधिकारी उमाकांत महालिंगे, राहुल शाक्यमुनी, चंद्रसेन भडके, करण ओव्हाळ, वसंत वाघमारे,गौतम सूर्यवंशी,सूर्यकांत दांडे,विक्रम चिकाटे,दगडू साळवे,हेमंत जाधव,विशाल कांबळे, दगडोजीराव सोनवणे,वसंत वाघमारे,धम्मरत्न सोनवणे, राजकूमार राऊत,राजकूमार कांबळे,तसेच तसेच उपासक व उपासिका यांची कार्यक्रमाला मुसळधार पाऊस कोसळत असताना ही मोठया संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रासात्विक ऍड. आनंद सोनवणे यांनी केले, सूत्रसंचालन अनिरुद्ध बनसोडे, मिलिंद धावारे व आभार प्रा. डॉ. दुष्यंत कटारे यांनी मानले.

# व्हि .एस. पँथर्सचे विनोद खटके यांचा वंचित बहुजन आघाडीत जाहीर प्रवेश

## वंचित बहुजन आघाडीने संविधान बचाव यात्रा काढली नसती तर मराठवाडा पेटला असता : ॲड. प्रकाश आंबेडकर







लातूर : राज्यात वंचित बहुजन आघाडीने संविधान बचाव यात्रा काढली नसती तर अवघा मराठवाडा पेटला असता. राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीत मराठा विरुद्ध ओबीसी अशी लढत होणार आहे. त्यामुळे मतदारांनी जात पाहून निर्णय न घेता सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने वंचितच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे असे प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केले.

लातूर येथील व्हि .एस. पँथर्सचे संस्थापक विनोद खटके यांच्या वंचित बहुजन आघाडीतील जाहीर प्रवेशाच्या अनुषंगाने आयोजित केलेल्या महामेळाव्यात ते बोलत होते. हा महामेळावा दयानंद सभागृहात हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पार पडला. विनोद खटके यांनी आपल्या असंख्य समर्थकांसह आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत वंचितमध्ये प्रवेश केला. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक पाटील यांच्यासह अविनाश भोसीकर,प्रवीण रणबादल , संतोष सूर्यवंशी, सलीमभाई , सावंत, रमेश गायकवाड, सय्यद, मंजुषा निंबाळकर, लामतुरे मॅडम यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

राज्यात आज सगळा अनागोंदी कारभार चालला आहे. सामाजिक शांतता राहिली नाही, महिला भगिनी सुरक्षित नाहीत. लैंगिक अत्याचार वाढले आहेत. आरक्षणाच्या कारणावरून सरकार दिशाभूल करत असल्याचा घणाघाती आरोप करून ॲड. प्रकाश आंबेडकर पुढे म्हणाले की, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण एक तत्वनिष्ठ नेते होते. तत्वासाठी त्यांनी कधीही पदाला महत्व दिले नाही. आज त्यांच्यासारख्या तत्वनिष्ठ नेत्याची राज्याला , देशाला आवश्यकता आहे. राज्यात मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार मनोज जरांगे यांच्या मागणीला पाठिंबाही देत नाहीत, विरोधही करत नाहीत. याचाच अर्थ ते योग्य निर्णय घेऊ शकत नाहीत. त्यामुळे मतदारांनी आगामी निवडणुकीत अशा निर्णय क्षमता नसलेल्या पक्ष आणि नेत्यांना थारा देऊ नये, असे मत व्यक्त करून शरद पवार हे थोर नेते आहेत, ते दाऊदचेही मित्र असल्याचे उपहासाने नमूद केले. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी कोणीही या आणि टिकली मारून जा, अशा वृत्तीच्या लोकांना त्यांची जागा दाखवून द्यावी. पैसे – दारूचे प्रलोभन दाखविणाऱ्यांना त्यांची जागा दाखवून द्यावी. विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर येणारे काही महिने वादळी असणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला यातून राज्य शासनाचा कारभार किती भ्रष्ट आहे ही बाब समोर आली. त्यामुळे सर्वांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. आजच्या राजकारणाचा आधारस्तंभ हा विकास नाहीतर दंगल घडविणे, विभाजन घडविणे हेझल आहे, हे राज्याच्या हिताच्या दृष्टीने योग्य नाही. महिला – मुलींच्यावर लैंगिक अत्याचार होत आहेत. महिलांच्या शरीराची विटंबना होत आहे. बलात्काऱ्यांना फासावर लटकावून हा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी कठोर निर्णयक्षमता असणारे सरकार हवे आहे. आजच्या परिस्थितीवर सरकारचे नियंत्रण नसल्याचा आरोपही त्यांनी केला. वंचितमध्ये प्रवेश केलेल्या विनोद खटके यांनी आपल्या मनोगतात व्हि. एस. पँथर्सच्या माध्यमातून आजपर्यंत केलेल्या सामाजिक कार्याची माहिती देऊन यापुढे वंचितच ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या आदेशाप्रमाणे काम करण्यास आपण व आपले सहकारी तयार असल्याचे सांगितले. यावेळी सय्यद, मंजुषा निंबाळकर, रमेश गायकवाड, संतोष सूर्यवंशी, अशोक पाटील, अविनाश भोसीकर यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष मांदळे यांनी तर आभार प्रदर्शन प्रतीक कांबळे यांनी केले. यावेळी अमोल सुरवसे, आनंद जाधव, किरण पांचाळ, शरद किणीकर, असदभाई शेख, रवी कांबळे, अतुल होळकर,. नितीन पडसाळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.


## संपादकीय....

# करणें ते अवघें बरें

भाकिते, पूर्वानुमान यांचे अर्थकारणात मोठे महत्त्व. कोणत्याही वित्तीय वा पतधोरणाला आकार देताना अंदाज–भाकिते आणि त्यावर आधारित गृहीतकेच कामी येतात. म्हणून या अंदाज, भाकितांचे धोरणकर्त्यांना ममत्व आणि कौतुक स्वाभाविकच. मात्र त्याचेच स्तोम माजवले जाऊ नये. व्यावसायिक म्हटले जाणाऱ्या तज्ज्ञांचे, अगदी रिझर्व्ह बँकेचे निष्णात भाकीतकारही ज्यात आले, त्यांनी व्यक्त केलेल्या कयास–भाकितांचेच पाहा. अलीकडे त्यांचे विचारभ्रमण नेमके कोणत्या गस्तीटापूवर सुरू आहे, याचा विचार करता अचंबा वाटावा अशी स्थिती आहे. ताजा संदर्भ हा शुक्रवारी प्रसिद्ध झालेल्या एप्रिल–मे–जून या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत भारताच्या अर्थव्यवस्थेने साधलेल्या वाढीच्या आकडेवारीचा आहे. या तिमाहीत अर्थगती ७.२ टक्के दराने वाढेल असा रिझर्व्ह बँकेचा कयास होता. प्रत्यक्षात ही वाढ ६.७ टक्के म्हणजेच पुरती अर्धा टक्क्यांनी कमी नोंदली गेली. हा असा अंदाजचुकीचा अनुभव पहिलाच नाही आणि तो केवळ रिझर्व्ह बँकेपुरताच मर्यादित आहे असेही नाही. एकूणच या अंदाज, आकलनांची चूक–अचूकता आणि त्याधारे केले जाणारे भाष्य यांचे विश्लेषण म्हणूनच क्रमप्राप्त ठरते. अधिकृत आकडेवारीनुसार, सकल देशांतर्गत उत्पादन अर्थात जीडीपी वाढीचा ताजा वेग हा पाच तिमाही म्हणजेच १५ महिने मागे नेणारा आहे. गेल्या वर्षी याच तिमाहीत ८.२ टक्के दराने वाढ साधली गेली होती. तर जानेवारी–मार्च–एप्रिल या आधीच्या तीन महिन्यांत नोंदवल्या गेलेल्या ७.८ टक्क्यांच्या तुलनेतही अर्थगती सव्वा–दीड टक्क्यांनी संकोचली आहे. स्वागतार्ह गोष्ट हीच की, ताज्या अधोगतीच्या आकड्यांवर सत्ताधारी नेत्यांपैकी कोणीही भाष्य करणे टाळले. अर्थात बोलण्यासारखे काही नाहीच. तज्ज्ञांपैकी देशाचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन आणि रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांची लगोलग विधाने आली. दोहोंचे मत जवळपास सामायिकच, हे अधिकच आश्चर्यकारक. लोकसभेच्या निवडणुका आणि त्यामुळे घटलेला सरकारी खर्च आणि थंडावलेली गुंतवणूक या कारणावर दोहोंनी बोट ठेवले आहे. १९ एप्रिलला पहिल्या टप्प्यातील मतदान झाले, तर १ जूनच्या सातव्या टप्प्यापर्यंत देशात मतदान सुरू होते. प्रत्यक्षात मार्च मध्यापासून ते जूनच्या पहिल्या सप्ताहापर्यंत लोकसभा निवडणुकांनिमित्त आदर्श आचारसंहिता लागू होती. या तीन महिन्यांहून अधिक काळ लांबलेल्या आचारसंहितेने मुख्यत्वे घात केला, असे दास यांनी थेट म्हटले आहे. भयंकर तापमान वाढ आणि आदल्या वर्षी पावसाने ओढ धरल्याने दुष्काळामुळे एप्रिल–मेमध्ये लोक त्राही त्राही करत होते. आचारसंहितेमुळे सरकारचे हात बांधले गेल्याने, अनेक भागांत गुरेढोरेही चारा–पाण्याविना होती इतकी लांबवली जाण्यावर म्हणूनच विरोधकांची त्या समयीची टीका जितकी रास्त, तितकाच आताचा दास यांचा तक्रारवजा सूरही समर्पकच. राजकीय लाभासाठी अर्थव्यवस्थेचा असा बळी दिला गेल्याचे त्यांनीच सूचित केले. निवडणूक आयोग आता तरी याची दखल घेईल काय? दोहोंच्या भाष्यांचे मर्म हेही की, गेल्या काही तिमाहींपासून सरकारकडून होत असलेल्या खर्चावरच देशाचा विकासगाडा ढकलला जात होता! सरकारकडून खर्चाचा हात आखडता घेतला जाताच अर्थगती सव्वा ते दीड टक्क्यांनी अडखळली. खासगी क्षेत्र म्हणजे आर्थिक गाड्याला पेलणारे दुसरे चाक अद्याप रुळावर आले नसल्याचीदेखील ही अप्रत्यक्ष कबुलीच.खरे तर आपल्याकडे निवडणुका म्हणजे एक उत्सवच असतो. सभा, मेळावे, मिरवणुकांची लगबग असते. गाड्या–घोडे, टोप्या, टी–शर्ट, झेंडे, बॅनर, मोठमोठाले फलक आदी साहित्यांची रेलचेल, नेते–कार्यकर्त्यांची सरबराई, हॉटेल, प्रवास, वाहतूक, खानपान अशा ऐवजांवर अब्जावधी यंदाही उधळले गेले. मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक दोन्ही प्रकारच्या माध्यमांतून राजकीय पक्षांच्या जाहिरातींचा रतीब सुरू होता. मात्र ऐन निवडणूक काळासंबंधाने आता जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार, व्यापार, हॉटेल, वाहतूक, दळणवळण आणि प्रक्षेपणाशी संबंधित सेवांमधील वाढीचा दर त्या तिमाहीत ५.७ टक्क्यांवर घसरला आहे. वर्षभरापूर्वी नोंदवलेल्या ९.७ टक्क्यांच्या तुलनेत ही घसरण अचंबित करणारी आहे. या अशा विपरीत चित्रामागील कारणही स्पष्ट आहे. प्रत्यक्ष निवडणूक खर्च हा बेहिशेबीच जास्त असतो याचाच हा प्रत्यक्ष पुरावा. एकंदरीत देशाच्या कृषी क्षेत्राची सुरू असलेली परवड पाहता, त्याने दोन टक्क्यांची वाढ नोंदवली हा एका परीने दिलासाच. हे अशासाठी म्हणावे लागते कारण, आधीच्या दोन तिमाहीत त्याने टक्काभरही वाढ दर्शवलेली नाही. मग या क्षेत्राने तडक चार–पाच टक्क्यांची झेप घेणारी मुसंडी मारावी तरी कशी? सध्याच्या सरकारची तरी तशी इच्छाशक्ती वा प्रयत्न आहेत? सरकारपेक्षा निसर्गाच्या कृपामर्जीवरच हे क्षेत्र पूर्वापार अवलंबून. उलट विद्यमान सरकारने साठे मर्यादा, निर्यात बंदी, वायदा बंदी सारख्या निर्णयांतून नुकसानच अधिक केले. असे असूनही या क्षेत्राने बऱ्यापैकी प्रगती केली आणि यंदा पाऊसपाणी चांगले झाल्याने पुढे शेतीत आणखी वाढीची अपेक्षाही करता येईल. कारखानदारी क्षेत्राने ७ टक्क्यांपुढे, तर बांधकाम क्षेत्राने १० टक्क्यांपुढे साधलेली वाढदेखील उत्साहदायी. यंदाच्या आकडेवारीतील सर्वाधिक निराशादायी दोन बाबींपैकी पहिली म्हणजे सेवा क्षेत्राचे मंदावलेपण. सेवा क्षेत्राचे सकल मूल्यवर्धन वार्षिक तुलनेत १२.६ टक्क्यांवरून थेट ७.१ टक्क्यांवर गडगडले आहे. मागील अनेक वर्षांत देशाच्या अर्थगतीला सावरण्यात या क्षेत्राचीच प्रमुख भूमिका राहिली आहे. प्रचंड रोजगारक्षम, निर्यातीला हातभार लावणाऱ्या आणि देशा–विदेशातून सर्वाधिक गुंतवणूकही आकर्षणाऱ्या या क्षेत्रानेच आता मान टाकली आहे. किंबहुना प्राप्त परिस्थितीत सात टक्के हाच त्याचा स्वाभाविक वाढीचा दर ठरावा. अतिउत्साही अंदाजाला आवर घाला, हाच ताज्या आकड्यांचा संकेत आहे. शहरी–ग्रामीण ग्राहकांची मागणी आणि उपभोगही अपेक्षेप्रमाणे न वाढणे, परिणामी उत्पादन विस्तारासाठी खासगी क्षेत्रातून गुंतवणुकीचा हात अद्याप सैलावलेला नसणे ही दुसरी चिंतेची बाब. दुःख याचेही की, प्रचारकी जुमले आणि कथानकांचा मुलामा हा आता अधिकृतपणे जाहीर होणाऱ्या आणि उणे–अधिक करण्यास शून्य वाव असणाऱ्या ठोस आकड्यांनाही चिकटू लागला आहे. कथानकवाद आणि शास्त्रीय कसोटीवरील तर्कसंगत कयास यात अर्थाअर्थी अपेक्षित असलेला फरक हरवत चालल्याचेच हे लक्षण. प्रतिष्ठित मानल्या गेलेल्या व्यक्ती–संस्थाही विश्वासार्हता पणाला लावून या चढाओढीत सामील आहेत. जसे वर्षभर कायम राखलेला सरासरी सात टक्क्यांच्या वाढीचा दर देशाच्या अर्थव्यवस्थेला सरलेल्या तिमाहीत सांभाळता आला नाही. पण तेवढा तर तेवढा, चीनच्या ४.७ टक्क्यांपेक्षा सरस आणि जगातील सर्वात वेगवान वाढ तर ती आहे

# ‘एक देश, एक निवडणूक’ प्रश्न मात्र अनेक!

‘एक देश, एक निवडणूक’ या संकल्पनेसाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली होती. तिच्या अहवालाचे विश्लेषण – ‘एक देश, एक निवडणूक’ हा घोषणावजा शब्दप्रयोग गेल्या दहा वर्षांत वारंवार चर्चेत येतो. यंदाच्या स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून पंतप्रधानांनी पुन्हा ‘एकत्रित निवडणुकां’चा मनोदय व्यक्त केल्यामुळे आता या चर्चेला, ‘२०२९ मध्येच एकत्रित निवडणूक’ अशीही फोडणी मिळाली आहे. पंतप्रधान होण्याआधीच, म्हणजे २०१३ मध्ये नरेंद्र मोदींनी एकाच वेळी निवडणुका घेण्याची मागणी पुन्हा पुन्हा केली होती. त्यामागची कारणे वेगवेगळी होती. मुख्यतः प्रचंड खर्च आणि सामान्य विकास कामांमध्ये व्यत्यय हे त्यांचे मुख्य मुद्दे होते. तेव्हापासून या विषयावर अनेक समित्या नेमल्या गेल्या पण त्यांच्यापैकी कुणालाच स्वीकारार्ह तोडगा काढता आला नाही. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समिती हा यासंदर्भातला शेवटचा प्रयत्न आहे. या विषयाची साधक–बाधक चर्चा करणे, त्यातले फायदे–तोटे बघणे यापेक्षाही अंमलबजावणी करण्यासाठी ठोस मार्ग सुचवणे हे काम या समितीकडून अपेक्षित होते. या समितीने अत्यंत विक्रमी वेळेत सविस्तर अहवाल सादर केला. २ सप्टेंबर २०२३ रोजी ही समिती नेमण्यात आली होती. तिने या विषयावर १९१ दिवस काम केले आणि १४ मार्च २०२४ रोजी १८,६२६ पानांचा अहवाल सादर केला. या समितीच्या सदस्यांमध्ये वेगवेगळी पार्श्वभूमी असलेल्या वेगवेगळ्या प्रतिष्ठित व्यक्ती होत्या. राजकीय पक्ष, निवृत्त सरन्यायाधीश, माजी मुख्य निवडणूक आयुक्त आणि राज्य निवडणूक आयुक्त, कायदेतज्ज्ञ अशा सगळ्यांकडून या समितीने सूचना मागवल्या. जनतेकडूनही सूचना मागविण्यात आल्या होत्या. बार कौन्सिल ऑफ इंडिया, कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री, फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री अशा सगळ्यांना त्यांचे मत मांडण्याची संधी देण्यात आली. अहवालानुसार, एकूण २१,५५८ जणांकडून प्रतिसाद मिळाला. त्यापैकी ८० टक्के लोक एकाच वेळी निवडणुका घेण्याच्या बाजूने होते. ४७ राजकीय पक्षांनीही आपले मत कळवले. त्यापैकी ३२ पक्षांचे या संकल्पनेला समर्थन होते आणि १५ पक्षांचा विरोध होता. त्यांनी या संकल्पनेची संभावना ‘लोकशाहीविरोधी’ तसेच ‘संघराज्यविरोधी’ अशी केली. एक देश, एक निवडणूक या संकल्पनेमुळे प्रादेशिक पक्षांना बाजूला केले जाईल, राष्ट्रीय पातळीवरील पक्षांचे वर्चस्व वाढेल आणि परिणामी अध्यक्षीय लोकशाही येईल, अशी भीती विरोधी राजकीय पक्षांनी व्यक्त केली. वेगवेगळ्या काळात निवडणुका झाल्यामुळे संसाधनांचा अपव्यय होतो असे एकाचवेळी देशभर निवडणुका घेण्याच्या मुद्द्याला पाठिंबा देणाऱ्यांचे मत होते. बहुसंख्य तज्ज्ञांना असे वाटत होते की राज्यघटना आणि संबंधित कायद्यांमध्ये दुरुस्त्या करणे आवश्यक आहे, पण अशा दुरुस्त्या लोकशाहीविरोधी किंवा संघराज्यविरोधी नसतील, हे आवर्जून पाहिले पाहिजे. अशा दुरुस्त्या संविधानाच्या मूलभूत रचनेच्या विरोधात जाणाऱ्या नसतील आणि त्या दुरुस्त्यांमधून संसदीय लोकशाहीचे स्वरूप बदलून तिला अध्यक्षीय स्वरूप येणार नाही, असे त्यांना वाटत होते. या अहवालाबाबतची सगळ्यात चांगली गोष्ट म्हणजे तो सर्वसमावेशक आहे (परिशिष्टांसह एकूण २१ खंड). त्यात भूतकाळातील तसेच वर्तमानातील सर्व मते प्रमाणिकपणे मांडली आहेत. त्यामुळे तो खरोखरच एक अत्यंत उपयुक्त दस्तऐवज आहे. समितीने देशात एकाच वेळी निवडणुका व्हाव्यात, असे एकमुखी मत देऊन त्यासाठी संविधान आणि संबंधित कायद्यांमध्ये आवश्यक दुरुस्त्या सुचवल्या आहेत. समितीने संविधानात ८२ अ हा एक नवीन अनुच्छेद सुचवला आहे. हा अनुच्छेद असे सांगतो की, ‘‘कलम ८३ आणि १७२ मध्ये काहीही असले तरी, नियुक्त तारखेनंतर होणाऱ्या कोणत्याही सार्वत्रिक निवडणुकीआधी स्थापन झालेल्या सर्व विधानसभांची पूर्ण मुदत संपुष्टात येईल’’. समितीने स्पष्ट केले की ‘सर्व देशभर एकाचवेळी निवडणुका’ यात पंचायत निवडणुका वगळून – लोकसभा आणि सर्व विधानसभेच्या एकत्रित निवडणुकांचा समावेश असेल. पंचायतीसाठी, लोकसभेनंतर ‘शंभर दिवसां’त निवडणुकांचा प्रस्ताव आहे. पण याचा अर्थ देशभर एकाचवेळी निवडणुका असा होत नाही. खरे तर, ही रोगापेक्षा उपाय वाईट अशी स्थिती आहे. एकदा लोकसभा तसेच विधानसभेची एकत्र निवडणूक झाल्यावर तीन महिन्यांनी पुन्हा नवी निवडणूक. त्यात पुन्हा आवश्यक तो बंदोबस्त. पुन्हा नवी मतदान केंद्रे उभारावी लागतील, पुन्हा प्रशिक्षण द्यावे लागेल. पुन्हा सुरक्षा तैनात करावी लागेल. जगातली सगळ्यात मोठी निवडणूक असे जिचे वर्णन केले जाते, ती झाल्यावर ती हाताळणारे साधारण दीड कोटी कर्मचारी जेमतेम त्या थकव्यातून बाहेर येत असताना त्यांना तीन महिन्यांत पुन्हा निवडणुकीच्या तयारीला लागावे लागेल. विशेष म्हणजे मतदारांना पुन्हा मतदान केंद्रावर यावे लागेल. त्यांच्यापैकी बरेच जण कुठेतरी बाहेरगावी असतील तर ते पुन्हा लगेचच येऊ शकणार नाहीत. अहवालात असेही म्हटले आहे की, ‘‘जेथे कोणत्याही राज्याची विधानसभा अविश्वास प्रस्ताव, त्रिशंकू सदन किंवा इतर कोणत्याही कारणामुळे बरखास्त झालेली असेल, अशा सभागृहासाठी त्यांचा कार्यकाळ लोकसभेबरोबरच संपेल या बेताने नव्याने निवडणुका घेतल्या जातील.’ पण यातून मध्यावधी निवडणुकांच्या मुद्द्याचे निराकरण होत नाही. उमेदवार एक ते दोन वर्षे एवढ्या कमी कालावधीसाठी निवडणुकीवर करोडो रुपये खर्च करेल का? याला देशभर एकाच वेळी होणारी निवडणूक नक्कीच म्हणता येणार नाही. तथापि, समितीने अनुच्छेद ३२५ मध्ये दुरुस्ती करून एकाच मतदार यादीच्या गरजेवर पुन्हा जोर देण्याचे चांगले काम केले आहे. कारण तिन्ही पातळ्यांवरचे मतदार एकच आहेत. हे म्हणजे ‘राज्य निवडणूक आयुक्तांशी सल्लामसलत करून’ स्थानिक निवडणूक यंत्रणांचे काम निवडणूक आयोगाकडे हस्तांतरित करणे आहे. ते अर्थातच तेवढे गुंतागुंतीचे नाही. समितीने निवडणूक आयोगाच्या गरजांची तपशीलवार नोंद घेतली आहे. त्यात खर्चाचा अंदाज तसेच ईव्हीएम, व्हीव्हीपीएटी, मतदान कर्मचारी, सुरक्षा दल, निवडणूक साहित्य इत्यादींचा समावेश आहे. त्यांनी खर्चाचा अंदाज किती काढला आहे, तो आकडा मला आत्ता सापडत नाहीये, पण सध्या लागतात त्याच्या तिप्पट संख्येने ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी लागतील हे उघड आहे. त्यांची किंमत प्रचंड असेल आणि त्यावर चर्चा होणे आवश्यक आहे. कारण एक देश एक निवडणूक या प्रस्तावामागे खर्चात कपात करणे हे एक मुख्य कारण होते. असे सगळे मुद्दे बघत गेल्यावर लक्षात येते की ‘एक देश एक निवडणूक’ या संकल्पनेने आपला नैतिक अधिकार गमावला आहे. ती राबवण्यासाठी प्रस्थापित असलेली लोकशाही व्यवस्था आणि राज्यघटना यांच्याशी का खेळायचे हा यातला मुख्य प्रश्न आहे. हा प्रस्ताव खरोखरच प्रामाणिक असेल, तर गेल्या दहा वर्षांत सर्व निवडणुका लांबणीवर का पडल्या? नेहमी एकाच वेळी होणाऱ्या हिमाचल आणि गुजरातच्या निवडणुका वारंवार वेगळ्या का केल्या गेल्या आणि प्रलंबित निवडणुका नेहमीप्रमाणे एकत्र का घेतल्या गेल्या नाहीत? त्यामुळे राष्ट्रहिताच्या नावाखाली मांडल्या गेलेल्या या प्रस्तावाच्या प्रामाणिकपणावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कारण पुढे जाऊन ‘एक राष्ट्र, एक राजकीय पक्ष’ किंवा ‘एक राष्ट्र, एक नेता’ असे का असू नये अशी पुढची साहजिक मागणी असू शकते. त्याबरोबरच अनेकांनी एका सरकारी समितीत भारताच्या माजी राष्ट्रपतींना आणण्याची काय गरज होती, असा प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांच्या मते हा सर्वोच्च घटनात्मक पदाचा अनादर आहे. माजी राष्ट्रपतींना सरकारी एका समितीत आणणे अयोग्य आहे, हा मुद्दा मीही वारंवार मांडला होता. कोणत्याही सरकारी समितीचा अहवाल म्हणजे एखाद्या वरिष्ठ अधिकाऱ्याने केलेल्या छाननीपलीकडे काहीही नसते. त्याला आव्हान दिले गेले तर फार तर एखाद्या न्यायाधीशाच्या पातळीवरून ही छाननी होते. सरकारी समितीच्या अहवालाचे हे वास्तव सगळ्यांनाच माहीत आहे.



# रोगराई,महागाई व भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन जा गे मारबत!

मारबत उत्सव ही नागपूरच्या इतिहासातील मोठी आणि ऐतिहासिक परंपरा आहे.मारबत उत्सवाची सुरूवात इंग्रजांच्या काळात सुरू करण्यात आली.यामागचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांना एकत्रित करून इंग्रजांविरूध्द मोठा लढा उभा करणे. कालांतराने हा उत्सव समाजातील वाईट चालीरितीचा व वाईट रूढींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे या सणाचे उद्दीष्ट ठरले.येणारे विघ्न दुर करण्यासाठी १८८० मध्ये काळ्या मारबतीची सुरूवात झाली.यानंतर १८८४मध्ये पिवळ्या मारबतीची सुरूवात झाली. आज काळ्या मारबतीला १४४ वर्षे पूर्ण होत आहे तर पिवळ्या मारबतीला १३९वर्षे पूर्ण होत आहे हा एक इतिहासच म्हणावा लागेल. दोन्ही मारबती मांडण्या मागचा एकच उद्देश होता आणि आहे तो म्हणजे येणारे विघ्न, रोगराई, महागाई, दुष्काळ दूर व्हावा. नागपूरसाठी आश्र्चर्याची गोष्ट म्हणजे आजही १४४ वर्षे जुनी परंपरा त्याच पद्धतीने पारपाडल्या जाते. हा नागपूरच्या इतिहासातीलच नाही तर भारतीय इतिहासातील परंपरेची मोठी धरोहर व संस्कृतीच म्हणावी लागेल.कारण या उत्सवात संपूर्ण धर्माचे लोक मोठ्या आनंदाने सहभागी होतात.त्यामुळे ही नागपुरकरांसाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे.त्याहीवेळेस मारबतीची सलग आठ दिवस पुजा–अर्चना व्हायची आणि आताही होते.त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक कार्यक्रम सुध्दा होतात.असेही सांगण्यात येते की मारबत ही नवसाला पावणारी असल्याची अनेकांची श्रद्धा आहे. मारबतीच्या दर्शनासाठी अनेकजन नवजात शिशूचे तोंड मारबतीच्या स्तनाला लावण्याची देखील प्रथा आहे.त्यामुळे काळ्या मारबतीचा व पिवळ्या मारबतीला पारंपरिक पद्धतीने महत्त्व दील्या जाते.मारबतीचा सन पोळ्याच्या पाडव्याला म्हणजे तान्हया पोळ्याच्या दिवशी भव्य मिरवणूक काढुन येणाऱ्या विघ्नांच्या व विघटनकारी शक्तीच्या विरोधात जय घोष करून ईडा–पीडा,माशा–मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबत अशा घोषणांनी केल्या जाते व संपूर्ण शहरातील नागरिक यात सहभागी होवून संपूर्ण नागपूर दुमदुमते.मोठ्या पोळ्याच्या दिवशी म्हणजेच अमावस्येला घरोघरी मेड्यांच्या (पळसाचे) फांद्यांची पुजा केली जाते व दुसऱ्या दिवशी पाडव्याला चौका–चौकामध्ये पळसाच्या फांद्यांचे दहन केले जाते व घोषणा केली जाते माशा–मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबतअशा घोषणा केल्या जातात.माझ्यामते सायंटिफिक दृष्ट्या किंवा सामाजिक दृष्ट्या पळसाच्या पानांच्या धुर अवश्य जंतुनाशकाचे कार्य करीत असावे यात दुमत नाही. कालांतराने या दिवसाला एवढे महत्त्व आले की भ्रष्ट व कलंकित राजनेता किंवा भ्रष्टाचारी यांच्या विरोधात त्याची प्रतीकृती काढून बडगा काढून निषेध केला जातो.त्याच प्रमाणे महागाई,अत्याचार, आतंकवाद, महामारी, बँक घोटाळे इत्यादींच्या विरोधात बडग्याच्या रूपात प्रतीकृती काढून निषेध नोंदविला जातो.यात अनेक सामाजिक संघटना (मंडळ) मोठ्या प्रमाणात सहभागी होतात.पिवळ्या व काळ्या मारबतीच्या रूपाने आज अनेक विघटनकारी शक्तीचा, अत्याचाराचा विरोध करून समाजात जनजागृती करण्याची काळ्या व पिवळ्या मारबतीपासुनच परंपरा मिळाली आहे असे मी समजतो. कारण यामुळे समाजात राजकीय पुढारी, अत्याचारी, भ्रष्टाचारी कोणते घृणास्पद कार्य करतात हे संपूर्ण उघडपणे बडग्याच्या रूपात आपल्याला व देशाला पहायला मिळते व यामुळे समाजात जनजागृती होत असते. म्हणजेच मारबत हा सन समाज जागृतीचा मोठा दिवस असल्याचे मी समजतो.कारण यामुळे राजकीय पुढाऱ्यांची मोठ्या प्रमाणात पोल–खोल होत असते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे १८९७ मध्ये प्लेगची साथ आली होती.त्यानंतर १९२८मध्ये नागपूरात इंग्रजांनी हिंदू–मुस्लिम दंगली घडविल्या तरीही संपूर्ण धर्माच्या समाजबंधवांनी मारबत उत्सवाला कुठेही तडा जाऊ दिली नाही ही नागपूरसाठी स्वाभिमानाची बाब आहे.त्यामुळे या दोन्ही वर्षी मारबत उत्सवात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण झाला नाही.परंतु करोना महामारीच्या काळात पहिल्यांदाच मारबत उत्सवातील मिरवणुकीत विग्घ निर्माण केले.परंतु करोना महामारी संपुष्टात आल्यानंतर देशातील संपूर्ण धर्माचे सण मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने साजरे व्हायला लागले.मुख्यत्वे करून समाजातील वाईट गोष्टींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे मारबत उत्सव या सणाचे मुख्य उद्दिष्ट आहे.मारबत उत्सवात बडग्यांची भुमिका मोलाची असते कारण बडगे हे देशातील विघातक गोष्टींचा निषेध नोंदविनारे असतात.यावर्षी मिरवणुकीत आपल्याला अनेक बडगे पहायला मिळेल यात महागाई, सिलेंडरची दरवाढ, पेट्रोल दरवाढ, शहरातील खड्डे,पाकिस्तान, चीन, आतंवाद, घोटाळेबाज,भ्रष्टाचारी, अत्याचारी, कलकत्ता व बदलापूरची घृणास्पद घटनेच्या विरोधात इत्यादींसह शंभरहून अधिक बडगे यावर्षी आपल्याला पहायला मिळु शकते.मारबत उत्सवाची सुरूवात नागपूर मधुन झाली.परंतु आता मारबत उत्सव महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात साजरा केल्या जातो.आज मारबत उत्सवाच्या निमित्ताने देशात होणारे अत्याचार, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, महागाई,वाढता भ्रष्टाचार यांचा विरोधात समाजाने एकत्रित येण्याच्या उद्देशाने देशातील अनेक राज्यांनी नागपुरची परंपरा अंगीकारून समाजात सर्वसामान्यांवर होणारा अत्याचार देशातील१४० कोटी जनतेने उघड्या डोळ्यांनी पाहावा या उद्देशाने मारबत उत्सवाच्या दिवशी प्रतिकात्मक पुतळ्याचे बडगे काढून विरोध प्रगट केल्या जातो.यामुळे सुध्दा समाजात जनजागृती होतांना आपण पहातो. देशातील भ्रष्टाचाऱ्यांनी देशाला इतके पोखरून टाकले आहे की यांच्यामुळे देशात महागाईचा डोंगर उभा झाला आहे.याचे प्रायश्चित्त देशातील १४० कोटी जनता भोगत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे व गरीबांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे.त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांना सर्वप्रथम घेऊन जा गे मारबत!

******

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# गुडलक सुनीता

आजूबाजूला काही का घडेना मख्खपणे बघून सोडून द्यावं, एवढं निर्ढावलेपण काही केल्या येत नाही. अगदी उगवती पिढी, जिला जनरेशन झेड म्हणतात, ती या बाबतीत कधी–कधी सुखी वाटू लागते. कुठलीही गोष्ट ज्ञ्ार मनाला लावून घ्यायची नाही ‘चिल’ ‘कूल’ वगैरे म्हणून झटक्यात विसरून जायचं, हे त्यांना चांगलं जमतं. परवा एका मित्रानं कानमंत्र दिला. म्हणाला, ‘बजबजपुरी झालीये, हे खरं. लहानग्या मुलींपासून महान व्यक्तींच्या पुतळ्यापर्यंत काहीच सुरक्षित नाही. शिवाय कुठलीही जखम क्षुल्लक ठरावी, इतकी राजकारणाची सूज वाढलेली. अशा वेळी मी अशी कल्पना करतो, की मी उंच अंतराळात गेलोय आणि पृथ्वीकडे पाहतोय. तिथून या सगळ्या घडामोडी खूप छोट्या वाटायला लागतात.

तात्पुरतं का होईना, टेन्शन कमी होतं.’ खरंतर हा उपाय साङ्ग चुकीचा; पण करून पाहावा म्हणून आकाशाकडे पाहिलं. मग डोळे मिटले. वाटलं, आता टेन्शन कमी होईल. पण मन अवकाशात पोहोचताच सगळ्यात आधी दिसली सुनीता विल्यम्स. नासाची, भारतीय वंशाची अंतराळवीर. तांत्रिक बिघाडामुळं त्रिशंकू अवस्थेत अडकून पडलेली. परवाच वाचलं होतं, तिला पुन्हा पृथ्वीवर आणायला २०२५ चा ङ्गेब्रुवारी महिना उजाडणार. म्हणजे, अजून सहा महिने ती शब्दशः लटकलेल्या अवस्थेत राहणार. मन विचार करू लागलं, तयारी नसताना इतके दिवस अंतरिक्षात कशी राहणार सुनीता? तिला किती प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागेल..!

खरंतर सुनीता अनेकदा अंतरिक्षात जाऊन आलीये. सगळ्यात जास्त म्हणजे सात वेळा स्कायवॉक करण्याचा विक्रम नोंदवलाय. पन्नास तास, चाळीस मिनिटं, इतक्या विक्रमी वेळाचा स्कायवॉक करणारी तीच. पण तिची सध्याची अंतराळवारी पाच जूनला सुरू झाली, ती आठवडाभरासाठी. मुळातच तिच्या परतीची वेळ उलटून दोन–तीन महिने झालेत. अजून सहा महिने..! बापरे!! मग आठवले, अशा परिस्थितीत मानवी शरीरावर होणारे खतरनाक परिणाम. मानवी शरीराची रचना शून्य गुरुत्वाकर्षणात दीर्घकाळ टिकून राहण्याजोगी नसते. गुरुत्वाकर्षणाविना शरीरातल्या द्रवांचा ओघ शरीराच्या वरच्या भागाकडे जाऊ लागतो. त्यामुळं द्रवाचं असंतुलन निर्माण होऊन डी–हायड्रेशनची समस्या सुरू होते. अशा परिस्थितीत मूत्रपिंडाचं काम क्षीण होतं. त्यामुळं किडनी स्टोनपासून दीर्घकालीन किडनी विकारापर्यंत काहीही होऊ शकतं. गुरुत्वाकर्षणाच्या अभावामुळं हाडं आणि स्नायूंचं नुकसानही वेगाने होऊ लागतं. हाडांचा सापळाच कमकुवत होत जातो आणि भविष्यातङ्ग्रॅक्चर किंवा जखमांच्या दृष्टीनं शरीर अधिक संवेदनशील बनतं. शरीरातल्या द्रवांचा ओघ डोक्याच्या दिशेने



वाढल्यामुळं त्या दिशेला दबाव वाढत जातो. त्यामुळं डोकेदुखी, डोळ्यांचा त्रास सुरू होतो आणिपंचेंद्रियांच्या संवेदनाही हळूहळू मंदावत जातात.

सगळ्यात भयानक म्हणजे गुरुत्वाकर्षणच नसल्यामुळं रक्ताभिसरण करण्यासाठी हृदयाच्या पंपाला जास्त मेहनत घ्यावी लागत नाही. परिणामी हृदयाचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं. हृदयाच्या संरचनेतही बदल होणं शक्य असतं. शिवाय अंतरिक्षात किरणोत्सर्गासारखे धोकेही टपून बसलेले असतात. अशा वातावरणात सुनीता आणखी सहा महिने अंतरिक्षात राहणार. बुच विल्मोर या एकमेव साथीदाराचा आधार. नुसती कल्पना केली आणि अंगावर काटा आला. क्षणभरासाठी मित्राचं म्हणणं तंतोतंत खरं ठरलं. आपल्या आजूबाजूच्या बजबजपुरीचा थोड्या वेळासाठी का होईना, विसर पडला.

# सकाळी रिकाम्या पोटी एक ग्लास दूध प्यायल्यास शरीरावर काय परिणाम होतात? वाचा, डॉक्टर काय सांगतात.



व्यक्ती लहान असो वा मोठी; प्रत्येकाच्या आरोग्यासाठी दूध चांगले मानले जाते. दुधात अनेक पोषक घटक असतात. त्यात कॅल्शियम, प्रोटीन, आवश्यक जीवनसत्त्वे, आरोग्यदायी चरबी यांसह बहुपोषक घटक मोठ्या प्रमाणात असतात. त्यामुळे डॉक्टरसुद्धा मुलांना लहानपणापासूनच दूध पिण्याचा सल्ला देतात. मात्र, रिकाम्या पोटी दूध पिणे आरोग्यासाठी फायदेशीर आहे की हानिकारक यावर अनेकदा चर्चा रंगताना दिसते. त्यामुळे याच प्रश्नावर काही तज्ज्ञ डॉक्टरांनी दी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना महत्त्वाची माहिती दिली आणि तीच आपण जाणून घेऊ

नवी मुंबईतील कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटलमधील गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट व हेपॅटोलॉजीच्या सल्लागार डॉ. सोनाली गौतम यांनी दुधातील पौष्टिक मूल्यांवर भर दिला आहे. त्या म्हणाल्या की, हाडांच्या आरोग्याला चालना देणे आणि एकंदरच आरोग्याचे संतुलन राखणे यांसाठी आहारात दुधाचा समावेश करणे फायद्याचे आहे.

दूध पिण्याचे काय फायदे आहेत? डॉ. गौतम पुढे म्हणाल्या की, दूध हा कॅल्शियम, फॉस्फरस आणि प्रथिनांचा उत्कृष्ट स्रोत आहे, जो हाडे मजबूत ठेवण्यास आणि दातांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी आवश्यक आहे, दुधाच्या सेवनाने कर्बोदके आणि चरबीचे चांगले संतुलन राखता येते. त्यामुळे आहारात दुधाचा समावेश करणे म्हणजे एक प्रकारे संतुलित आहाराचे सेवन करण्यासारखे आहे.

दुधामध्ये ड व बी-१२ ही जीवनसत्त्वे आणि मॅग्नेशियमसह अनेक आवश्यक खनिजे असतात; जी विविध शारीरिक कार्यांमध्ये मदत करतात.

रिकाम्या पोटी दूध प्यावे का? डॉ. गौतम यांच्या मते, रिकाम्या पोटी दूध पिणे हानिकारक ठरू शकते हा समजच मुळात निराधार आहे. त्यामागे कोणतेही वैज्ञानिक कारण नाही. लॅक्टोज इनटॉलरन्समुळे काही व्यक्तींना पचनाशी संबंधित समस्या असू शकतात. परंतु, वैद्यकीय अभ्यासात सामान्य लोकांसाठी रिकाम्या पोटी दूध पिण्याचे कोणतेही प्रतिकूल परिणाम दिसून आलेले नाहीत. किंबहुना डॉ. गौतम यांनीही असे नमूद केले की, सकाळच्या नाश्त्यामध्ये जास्त प्रमाणात प्रोटीन असलेल्या दुधाचा समावेश केला पाहिजे. कारण- त्यामुळे मधुमेह असलेल्या व्यक्तींच्या रक्तातील साखरेच्या प्रमाणावर चांगल्या प्रकारे नियंत्रण ठेवण्यास मदत होते. लॅक्टोज इनटॉलरन्समुळे तुम्हाला पचनासंबंधीच्या समस्या जाणवू शकतात. पोट फुगणे, गॅस व अतिसार यांसारखी लक्षणेही दिसू शकतात. विशेषत: बऱ्याच भारतीय लोकांना याचा त्रास जाणवतो; पण ते याकडे लक्ष देत नाहीत. जर तुम्हालाही लॅक्टोज इनटॉलरन्सचा त्रास जाणवत असल्यास, तुमच्या आहारात कोणते बदल केले पाहिजेत याविषयी सल्ला घेण्यासाठी तुम्ही तुमच्या डॉक्टरांचा किंवा आहारतज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे, असे डॉक्टर गौतम यांनी सांगितले. अशा परिस्थितीत बदाम दूध, सोया दूध किंवा नारळाचे दूध यांसारखे वनस्पती-आधारित दुधाचे पर्याय फायदेशीर ठरू शकतात.

दूध हा संतुलित आहाराचा एक महत्त्वाचा घटक आहे. त्यामध्ये अनेक आवश्यक पोषक घटक असतात. लॅक्टोज इनटॉलरन्स हा त्रास विचारात घेण्यासारखा असला तरी बहुतेक लोकांच्या आरोग्यासाठी रिकाम्या पोटी दुधाचे सेवन करणे सामान्यतः सुरक्षित असते.

# संविधान अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित सामाजिक संवाद मेळावा संपन्न

लातूर :- भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्ष व स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने विवेक विचार मंच आणि सहयोगी संघटनांच्या वतीने समाजातील वंचित घटकांमध्ये कार्य करणाऱ्या सामाजिक नेतृत्व व संस्था संघटनांच्या प्रतिनिधींचा सामाजिक संवाद मेळावा लातूर मध्ये संपन्न झाला. या मेळाव्यातून अनुसूचित जाती आणि वंचित घटकांचे प्रश्न, सद्यस्थिती, भारतीय संविधान, आरक्षण, सामाजिक न्याय तसेच अन्याय अत्याचारच्या विविध घटना, घडामोडी, शासकीय योजना, धोरण अशा विषयासंदर्भात चर्चा संवाद झाला. मेळाव्यात उपस्थित सामाजिक कार्यकर्त्यांनी सामाजिक न्यायाच्या अनेक विषयांवर मते व्यक्त केली. मेळाव्याची सुरुवात संविधान सरनामा वाचनाने झाली. विवेक विचार मंचाचे जिल्हा संयोजक दत्ता म्हस्के यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी मंचावर उपस्थित सामाजिक कार्यकर्ते संजय कांबळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, अनुसूचित जाती बांधवांनी उद्योग व्यवसायाकडे सुद्धा वळले पाहिजे. त्यासाठी सरकारी योजनांचा लाभ घेतला पाहिजे. सामाजिक भेद व तणाव कमी होण्यासाठी समाजात सुसंवाद व समन्वय वाढायला हवा.




यावेळी उपस्थित असलेले विवेक विचार मंचाचे राज्य संयोजक सागर शिंदे यांनी मत व्यक्त केले की, भारतीय संविधान हे आपल्या एकतेचे सूत्र असून त्यात बदल होणे शक्य नाही. सामाजिक न्याय शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहचवणे सर्वांचीच जबाबदारी आहे. संविधान बदल होणार, आरक्षण जाणार या निव्वळ राजकीय लाभासाठी हेतुपुरस्सर पसरवलेल्या अफवा आहेत. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. चौरे सर यांनी तर आभारप्रदर्शन संजय सोनकांबळे यांनी केले.

# रोज चहा प्यायल्याने हृदयविकाराचा धोका कमी होतो का? संशोधनातून समोर आली माहिती; वाचा, तज्ज्ञ काय सांगतात.



आपल्यापैकी बरेच लोक दिवसाची सुरुवात एक कप चहाने करतात. काही लोक दिवसातून तीन ते चार वेळा चहा पितात. प्रमाणापेक्षा जास्त चहा पिणे, हे आरोग्यासाठी चांगले नाही; पण काही वेळा चहा हा आपल्या आरोग्यासाठी फायद्याचा ठरू शकतो. आता तुम्हाला प्रश्न पडला असेल, हे कसं काय शक्य आहे? एका नवीन अभ्यासातून समोर आलेल्या माहितीनुसार, नियमित चहा प्यायल्याने हृदयविकाराचा धोका कमी होतो. याविषयी मुंबई येथील नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथील इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. राजीव भागवत यांनी दी इंडियन एक्स्प्रेसला सविस्तर माहिती सांगितली आहे. डॉ. भागवत सांगतात, अनेकदा माझे अनेक रुग्ण मला विचारतात की, त्यांनी ग्रीन टी प्यायला पाहिजे का? कारण- हृदयाच्या आरोग्यासाठी ग्रीन टी फायदेशीर आहे. हृदय व रक्तवाहिन्या संबंधित आरोग्यासाठी ग्रीन टी आणि ब्लॅक टी हे दोन्ही पिण्याच्या फायद्यांवर अनेकदा संशोधन करण्यात आले. त्यावर समाधानकारक माहिती समोर आली नाही; पण अनेक अभ्यासांद्वारे हे सिद्ध झाले आहे.

ते पुढे सांगतात, यूकेमधील एका अभ्यासात सांगितले आहे की, जर तुम्ही अनेक वर्षांपासून नियमितपणे चहा पीत असाल, तर तुमचा हृदयविकाराने मृत्यू होण्याचा धोका कमी होऊ शकतो. या अभ्यासात असेही सांगितले आहे की, ज्या प्रौढ व्यक्ती सात वर्षांहून अधिक काळ दिवसातून दोन कप चहा पितात, त्यांना हृदयविकाराने मृत्यू होण्याचा धोका कमी प्रमाणात चहा पिणाऱ्या किंवा चहा न पिणाऱ्यांपेक्षा १९ टक्क्यांनी कमी असतो.

चहा हृदयाच्या आरोग्यासाठी कसा फायदेशीर?

चहामध्ये हृदयाला सुरक्षित ठेवणारी संयुगे असतात; जी जळजळ वाटणे आणि शरीरातील खराब होणाऱ्या पेशींबरोबर लढतात. त्यामुळे रक्तवाहिन्या चांगले कार्य करू शकतात. ब्लॅक व ग्रीन टीमध्ये फ्लेव्होनॉइड्स व पॉलीफेनॉल्स यांसारखी अँटिऑक्सिडंट्स असल्यामुळे हार्ट अटॅक आणि स्ट्रोकचा धोका कमी होतो.

२०१८ मध्ये उंदरांवर ब्लॅक टीची चाचणी करण्यात आली होती. त्यातून असे दिसून आले की, ज्या उंदरांनी ब्लॅक टीचे सेवन केले म्हणजेच त्यामध्ये असणाऱ्या अँटीऑक्सिडंट्स पॉलीफेनॉलचे सेवन केले. त्यांच्या कोलेस्ट्रॉलमध्ये १०.३९ टक्के, एलडीएल कोलेस्ट्रॉलमध्ये १०.८४ टक्के आणि ट्रायग्लिसराइड्समध्ये ६.६ टक्के घट दिसून आली आहे. ग्रीन टीमधील संयुगे रक्तवाहिन्यांमधील गुठळ्यांना जोडलेले प्लेक्स तोडण्यास मदत करतात. काही अभ्यासांत सांगितल्याप्रमाणे, ग्रीन टी प्यायल्याने कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते. ग्रीन टीमध्ये कॅटेचिन असतात, जे अति जास्त वाढलेल्या प्लेटलेट्स नियंत्रित करतात. तुम्ही योग्य प्रकारे चहा घेता का? चहामध्ये संयुगे असतात, त्याचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. पॉलीफेनॉल शरीरात दीर्घकाळ साठवले जात नाहीत. त्यामुळे नियमित एका ठराविक कालावधीनंतर चहा पिणे हृदयाच्या आरोग्यासाठी चांगले ठरू शकते. कॉफीपेक्षा चहामध्ये कमी कॅफिन असते तरीसुद्धा आपण किती प्रमाणात कॅफिनचे सेवन करतोय, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. कोणत्याही प्रकारच्या चहापेक्षा ब्लॅक टीमध्ये सर्वाधिक प्रमाणात कॅफिन असते. एक कप चहामध्ये ४७ मिलिग्रॅम, तर ग्रीन टीमध्ये २८ मिलिग्रॅम कॅफिन असते. त्यामुळे चहाचे अतिसेवन करू नये. चहामध्ये टॅनिन, पॉलिफेनॉल हे घटक असतात आणि त्यामुळे तुमची पचनसंस्थासुद्धा बिघडू शकते. आपल्या देशात सामान्यत: चहा उकळला जातो; पण चहा उकळू नये. फक्त ८० ते ९० डिग्री सेल्सिअसवर गरम पाण्यात चहा पावडर टाका. चहा जास्त उकळल्याने त्यातील शरीरास फायदेशीर संयुगे नष्ट होतात. तुम्हाला चहा प्यायला आवडत असेल, तर त्यात साखर किंवा दूध घालू नका. कारण- त्यामुळे कॅलरीज वाढतात आणि वजन वाढू शकते. तसेच, कोलेस्ट्रॉलची पातळीही वाढू शकते. कोणत्याही प्रकारच्या साखरयुक्त पेय किंवा साखरयुक्त चहाने हृदयाशी संबंधित आजारांचा आणि त्यामुळे होणाऱ्या मृत्यूचा धोका वाढतो.

# भारताच्या प्रत्येक गावात क्रीडा संस्कृती रुजली पाहिजे सचिव माधवराव पाटील टाकळीकर





लातूर :- आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध खेळांचा दर्जा उंचावयाचा असल्यास भारतातील प्रत्येक खेड्यात जाणीवपूर्वक क्रीडा संस्कृती रुजवण्याची नितांत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांनी केले. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील सभागृहात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, क्रीडा विभाग, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रीक रोमन आणि फ्रीस्टाइल आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात ते उद्घाटक म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचारपीठावर शिक्षण संस्थेचे सहसचिव सुनीलजी मिटकरी, विद्यापीठ निवड समितीचे प्रा. मधुकर क्षिरसागर, पंच समितीचे प्रमुख डॉ. विठ्ठल डुमनार, प्रा. टी. एस. केंद्रे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमात सुरुवातीला जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलन करण्यात आले.

पुढे बोलताना माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, शिक्षण संस्था, राजकारणी आणि समाज दुरिणांची प्रभावी भूमिका तसेच प्रसारमाध्यमांच्या योगदानातून देशाच्या कानाकोपऱ्यात क्रीडांगणे भरली पाहिजेत. भारतीय परंपरेत खेळाला सर्वाधिक महत्त्व आहे. आपण पूर्वजांची परंपरा विसरत चाललो आहोत. चित्तशुद्धी आणि देहशुद्धीकरिता विविध खेळ प्रकार महत्त्वाचे आहेत. रामायण आणि महाभारत यातही कुस्ती या क्रीडा प्रकाराचे दाखले आपणास मिळतात. लातूर ही शिक्षणाची पंढरी मानले जाते. पण अलीकडच्या काळात कुस्तीतही लातूरने नवा पॅटर्न तयार केला आहे. ग्रामीण भागातील महिलांना संधी देणे, त्यांचे प्रशिक्षण घेणे, त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि वारंवार त्यांचा सराव घेणे या गोष्टी केल्यास नक्कीच भविष्य उज्वल असेल असेही ते म्हणाले.

यावेळी संस्थेचे सहसचिव सुनीलजी मिटकरी म्हणाले की, कुस्ती या खेळाला आपण सर्वांच्या सहकार्यातून आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्यासाठी सर्व कुस्तीगिरांना शास्त्रशुद्ध प्रशिक्षण दिले पाहिजे. कुस्ती हा खेळ बुद्धिचातुर्य आणि शरीर सशक्तिकरण आणि युक्तीचा प्रभावी खेळ असल्याचेही सांगून लातूर, नांदेड, परभणी आणि हिंगोली येथून आलेल्या सर्व कुस्तीपटूंना प्रशिक्षक, पंच, आणि कोच यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, कोणत्याही क्रीडा प्रकारात राजकारण न आणता खेळाडूंना सर्व सुविधा पुरवल्या गेल्या पाहिजेत. ओस पडत जाणारी मैदानी पुन्हा नव्याने संजीवनी देऊन सेवा सुविधा पुरवून शासनाने जाणीवपूर्वक प्रयत्न केल्यास खेळाला चांगले दिवस येतील असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा विभाग प्रमुख डॉ. नल्ला भास्कर रेड्डी यांनी केले सूत्रसंचालन डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले तर आभार डॉ. टी घनशाम यांनी मानले

या स्पर्धेला स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिक्षेत्रातील ७० पेक्षा अधिक मल्ल उपस्थित होते. ग्रीक रोमन आणि फ्रीस्टाइल या दोन प्रकारातील मल्लांची झुंज पाहण्यास मिळाली.

# आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्या जनसन्मान पदयात्रेस उस्त्फुर्त प्रतिसाद दहा दिवसांदरम्यान मतदारसंघातील जनतेचा मोठा सहभाग







## गौर आनंदवाडी साजरा केला पोळा

पदयात्रेच्या दहाव्या दिवशी आ. निलंगेकर निलंगा तालुक्यातील गौर आनंदवाडी येथे पोहोचले या दिवशी बैलपोळा असल्याने याच गावात त्यांनी पोळ्याचा सण साजरा केला. या गावातील शेतकजयांनी काढलेल्या बैलांच्या मिरवणूकीत सहभाग नोंदवून आ. निलंगेकरांनी बैलांचे पुजन करून त्यांच्यावर पुष्पवृष्टी केली. यावेळी त्यांच्या समवेत भालकीचे माजी आ. प्रकाश खंड्रे यांच्यासह मतदारसंघातील पदाधिकारी व लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आज दि. ३ सप्टेबर रोजी गौर आनंदवाडी या गावाची ग्रामसभा आ. निलंगेकर यांच्या उपस्थितीत पार पडणार असून यानंतर प्रशासकीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत मतदारसंघातील विविध समस्यांचे निराकरण आ. निलंगेकर यांच्याकडून करण्यात येणार आहे.

निलंगा/प्रतिनिधी : जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी दि. २४ ऑगस्ट पासून माकणी थोर येथून जनसन्मान पदयात्रा काढलेली आहे. या पदयात्रेस उस्त्फुत प्रतिसाद मिळत असून या दहा दिवसांदरम्यान मतदारसंघातील जनतेने यात्रेत मोठा सहभाग नोंदविलाआहे. ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता आ. निलंगेकर केवळ मतदारांच्या उस्त्फुत प्रतिसादाने मिळालेल्या ऊर्जेद्वारे चालताना पाहण्यास मिळत आहेत. या यात्रेत मतदारांशी संवाद साधताना आ. निलंगेकर गेल्या दहा वर्षात त्यांनी केलेल्या विकासाचा लेखा जोखा मांडत भावी पीढीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी पुन्हा एकदा आपल्याला आशिर्वाद द्यावा अशी साद घालत आहेत. त्यांच्या या हाकेला मतदारही तितकाच प्रतिसाद देत असल्याचे बोलले जात आहे. जिल्ह्याच्या राजकारणाचे केंद्रबिंदू असलेल्या निलंगा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करणारे आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी दि. २४ ऑगस्टपासून निलंगा तालुक्यातील माकणी थोर येथून जनसन्मान पदयात्रा सुरू केलेली आहे. विकासाची वारी आपल्या दारी असे ब्रिद घेवून निघालेल्या पदयात्रेच्या माध्यमातून आ. निलंगेकर मतदारसंघातील १०० गावांना भेटी देवून ३०० क़िमी. पायी प्रवास करत आहेत. या यात्रेत पहिल्या दिवसापासूनच मतदारसंघातील जनता मोठ्या संख्येने सहभागी होत असल्याचे पाहण्यास मिळत आहेत. मतदारसंघातील निलंगा, देवणी व शिरुर अनंतपाळ या तिन्ही तालुक्यातील ग्रामीण भाग या पदयात्रेद्वारे आ. निलंगेकरांनी ढवळून काढलेला आहे. गेल्या दहा वर्षात त्यांनी केलेल्या विकास कामांचा लेखाजोखा ते जनतेसमोर मांडत असून केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटपही या यात्रेदरम्यान करण्यात येत आहे. त्याचबरोबर मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या महिला लाभार्थ्यांनाही आ. निलंगेकर यांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात येत आहे. या यात्रेदरम्यान होणाजया संवाद सभांना गावा-गावातील महिलांचीही लक्षणीय उपस्थिती लाभत आहे. आ. निलंगेकर या यात्रेदरम्यान जनतेशी संवाद साधत असताना केंद्र व राज्यातील सरकार लोकहिताचे असून प्रत्येक उंबरठ्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी या सरकारच्या माध्यमातून विविध योजना राबविण्यात येत असल्याची माहिती त्यांच्याकडून देण्यात येत आहे. लोकसभेत विरोधकांनी दिशाभूल करीत अपप्रचार केला होता. आणि आता आगामी विधानसभा निवडणुकीतही विरोधकांचा तोच प्रयत्न राहणार असल्याचे आ. निलंगेकर सांगत आहेत. त्यामुळेच विरोधकांच्या भूलथापा व अपप्रचाराला बळी न पडता समाजातील प्रत्येक घटकाच्या विकासासाठी बांधिल असलेल्या उमेदवाराला व पक्षाला खंबीर साथ देवून आशिर्वाद द्यावा, असे आवाहन ते करीत आहेत. त्यांच्या या आवाहनाला उपस्थितांकडून हात उंचावून तितकाच मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.

# मांजरा परिवार विश्वासार्हतेचा लोकप्रिय ब्रँड माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे प्रतिपादन

## मराठवाड्यातील महाविकास आघाडीच्या कामगिरीने महायुतीची झोप उडाली आ अमित विलासराव देशमुख

लातूर / प्रतिनिधी : – माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या पुढाकारातून स्थापन झालेल्या मांजरा परिवारातील सर्व साखर कारखाने बँका आणि इतर संस्थानी प्रयोगशील राहून शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य जनतेच्या जीवनात परिवर्तन घडवण्याचा उद्देश साध्य केला आहे, त्यामुळे मांजरा हा विश्वासहारतेचा ब्रँड तयार झाला आहे, ही विश्वासार्हता कधीही कमी होऊ दिली जाणार नाही असा विश्वास, माजी मंत्री, दिलीपराव देशमुख यांनी विलास सहकारी साखर कारखान्याच्या सर्वसाधारण सभेत बोलताना व्यक्त केला. विकास कारखान्याच्या अध्यक्षा आदरणीय वैशालीताई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली नेवळी येथील कारखाना साइटवर कारखान्याची २२ वी सर्वसाधारण सभा आज अत्यंत खेळीमळीच्या वातावरणात पार पडली या सभेत या सभेत मांजरा परिवाराचे आधारवड दिलीपरावजी देशमुख यांचा डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजिस्ट संस्थेकडून पुरस्कार मिळाल्याबद्दल तसेच लातूर जिल्हा बँकेच्या अध्यक्ष आमदार धीरज देशमुख आणि लातूरचे नवनिर्वाचित खासदार डॉ शिवाजी काळगे, धाराशिवचे खासदार ओमप्रकाश निंबाळकर यांचा या सभेत यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, लातूरचे नवनिर्वाचित खासदार डॉ शिवाजी काळगे, धाराशिवचे खासदार ओमप्रकाश निंबाळकर, लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख, रीड लातूरच्या संस्थापीका दिपशिखा धिरज देशमुख, माजी आमदार वैजनाथ शिंदे, कारखान्याचे व्हा. चेअरमन रवींद्र काळे, कार्यकारी संचालक संजीव देसाई, युनिट २ चे कार्यकारी संचालक ए.आर.पवार, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन श्रीशैल उटगे, रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, विलास को–ऑपरेटिव्ह बँकेचे व्हॉइस चेअरमन समद पटेल, श्रीपतराव काकडे, सचिन पाटील, संभाजी सुळ, अभय साळुंके, अजित माने, कल्याण पाटील, मारुती पांडे, लक्ष्मण मोरे, ज्योतीताई पवार, जितेंद्र स्वामी, सचिन दाताळ, राजकुमार पाटील, प्रताप पाटील, कैलास पाटील, विदया पाटील, स्वयंप्रभा पाटील उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना दिलीपरावजी देशमुख म्हणाले की, डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजिस्ट या संस्थेकडून माझा झालेला सन्मान हा प्रातिनिधीक स्वरूपाचा होता, या सन्मानासाठी मांजरा परिवारातील प्रत्येक घटक तेवढाच हक्कदार आहे त्यामुळे मी सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो आहे, मांजरा परिवाराची सुरुवात, ग्रामीण भागात आर्थिक परिवर्तन घडवण्याच्या उद्देशाने मांजरात कारखान्याची स्थापना करून झाली आहे, माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासरावजी देशमुख साहेब यांचे ग्रामीण विकासाच्या स्वप्न साकार करण्यासाठी आज मांजरा परिवारातील प्रत्येक संस्था आणि त्या संस्थेची निगडित असलेला प्रत्येक माणूस प्रयत्नशील आहे, या कार्यातील सर्वांचे योगदानच एकूण यशा मागचे गमक आहे असे मी मानतो आहे. आधी केले मग सांगितले या युक्तीप्रमाणे मांजरा परिवारात चांगले निर्णय घेतले जातात, त्यावर अंमलबजावणी केले जाते आणि मग इतर समोर त्याचे परिणाम ठेवले जातात, यातून मराठवाड्यातच नव्हे तर राज्यात आणि देशात मांजरा परिवाराचा आदर्श अनुकरणीय पॅटर्न तयार झाला आहे. आता हा परिवार जिल्हा पुरता मर्यादित राहिला नसून मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक कारखाना आदर्श पद्धतीने चालवून इतरांना त्या त्या पद्धतीचे कार्य करण्याची प्रेरणा देत असल्याचेही त्यांनी म्हंटले. मराठवाड्यातील महाविकास आघाडीच्या कामगिरीने महायुतीची झोप उडाली आ अमित विलासराव देशमुख लोकसभा निवडणुकीत मराठवाड्यात महाविकास आघाडीला मिळालेल्या उत्तुंग यशामुळे विद्यमान महायुती सरकारची झोप उडाली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीतही आपली एकजूट कायम राहिल्यास मराठवाड्यात आणि पर्यायाने महाराष्ट्राच्या विधानसभेवर महाविकास आघाडीचा झेंडा फडकल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास माजी मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी या सर्वसाधारण सभेत बोलताना व्यक्त केला. या सर्वसाधारण सभेत उपस्थित असलेले सर्व शेतकरी सभासद, आणि लातूर, धाराशिव जिल्ह्यातून आलेले पदाधिकारी कार्यकर्ते यांच्याशी संवाद साधला. आमदार अमित देशमुख यावेळी म्हणाले की, केंद्र शासनापेक्षा महाराष्ट्रातील महायुती सरकारवर जनतेचा अधिक रोष आहे, त्यामुळेच राज्यात महाविकास आघाडीला उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहेत. काँग्रेस आणि मित्र पक्षाकडे उमेदवारी मागणाऱ्यांची संख्या प्रचंड वाढली आहे, यावरून राज्यात परिवर्तन अटळ आहे हे दिसून येत आहे. जागा मर्यादित आणि इच्छुक अधिक असले तरी ज्यांना उमेदवारी मिळेल त्यांना विजय करण्यासाठी सर्वांनी आपला एकोपा कायम ठेवायचा आहे. सुरक्षित बहीण योजना कधी आणणार यावेळी पूढे बोलतांना यावेळी माजी मंत्री आमदार अमित देशमुख म्हणाले, महाविकास आघाडीला मिळत असलेल्या प्रतिसादामुळे महायुतीची झोप उडाली असून लाडक्या बहिणी सारख्या योजना जाहीर केल्या जात आहेत, लाडक्या बहिन योजनेला आमचा विरोध नाही परंतु सुरक्षित बहिण योजना कधी आणणार हा आमचा सरकारला प्रश्न आहे. कंत्राट वाटण्यात आणि कमिशन गोळा करण्यात सरकारचे प्रतिनिधी व्यस्त राज्यात सत्ताधारी असलेल्या महायुतीच्या तिघाडी सरकारमध्ये एक वाक्यता नाही, कंत्राट वाटण्यात आणि कमिशन गोळा करण्यात या सरकारचे प्रतिनिधी धुंद आहेत हे सर्व चित्र महाराष्ट्रातील जनता उघड्या डोळ्यांनी पहात आहे असे यावेळी आमदार अमित देशमुख म्हणाले. . महायुती सरकारला माफी नाही वाऱ्याने पुतळा पडू शकतो असे आजवर जगभरातले एकही उदाहरण नाही



त्यामुळे मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्यामागे महायुती सरकारचा भ्रष्ट कारभार आणि निष्काळजीपणा कारणीभूत आहे हे स्पष्ट आहे, या परिस्थितीत सरकारला जनता कदापिही माफ करणार नाही हे उघड आहे असे यावेळी बोलतांना माजी मंत्री आमदार अमित देशमुख म्हणाले., बदलत्या तंत्रज्ञानामुळे ऊस शेतीला मोठे भवितव्य तंत्रज्ञानात होत असलेल्या संशोधनामुळे उसापासून उपपदार्थ निर्मिती आणि त्याच्या वापरात क्रांतिकारी बदल घडून येत आहेत, या परिस्थितीत ऊस शेतीला मोठे भवितव्य असून हे ऊसउत्पादन वाढवण्यासाठी मराठवाड्यात मोठा वाव असल्याचेही आमदार अमित देशमुख यांनी यावेळी बोलताना सांगितले. राज्यात परीवर्तन घडवावे खासदार ओमराजे निबाळकर शेतकरी, शेतमजूर आणि सामान्य जनतेचे जगणेच केंद्र आणि राज्यसरकारला मान्य नाही त्यामुळेच त्यांच्याकडून या घटकांची सातत्याने पिळवणूक केली जात आहे असे सांगून या सर्व घटकांनी एकत्र येऊन आगामी विधानसभा निवडणूकीत अन्यायकारक सत्ता उलथवून टाकावी असे आवाहन, धाराशिवचे खासदार ओमराजे निबाळकर यांनी केले. शेतकऱ्यांचा पीकविमा म्हणून केंद्र आणि राज्यसरकारकडून वीमा कंपन्यांना प्रति हेंक्टरी १८ हजार रुपये दिले जातात या बदल्यात वीमा कंपन्याकडून शेतकऱ्यांना काहीच मोबदला मिळत नाही यावरुन योतकऱ्यांच्या नावावर वीमा कंपन्यांना जगवण्याचे काम सत्ताधाऱ्याकडून होत आहे हे स्पष्ट दिसत आहे, अशा सत्ताधाऱ्यांना बदलण्या शिवाय दुसरा पर्याय राहीला नाही. आदरणीय पवनराजे यांच्या नंतर आदरणीय विलासराव देशमुख यांनी आपणाला पुत्रप्रेम आणि पाठींबा दिला असे सांगून आदरणीय दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते आज मांजरा परीवाराच्या वतीने झालेल्या सत्काराने आपण भारावून गेलो असल्याचे त्यांनी सांगीतले. कार्यकर्त्यांनी एकजूट दाखवून संधीचे सोने करावे राज्यात परीवर्तन घडवावे खासदार डॉ. शिवाजी काळगे केंद्रापेक्षा राज्यातील सरकारवर जनतेचा अधिक रोष आहे त्यामुळे लोकसभा निवडणूकी प्रमाणेच आगामी विधानसभा निवडणूकीत महाविकास आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी एकजूट दाखवून संधीचे सोने करावे, राज्यात परीवर्तन घडवावे असे आवाहन खासदार डॉ.शिवाजी काळगे यांनी या प्रसंगी केले. लातूर मतदारंसघातील जनतेने आशीर्वाद देऊन लोकसभत पाठविल्याबददल आणि मांजरा परीवाराने सत्कार केल्या बददल त्यांनी यावेळी आभार मानले. पराभव समोर दिसत असल्याने निवडणूका पूढे ढकलण्याचे षडयंत्र आमदार धिरज देशमुख महीलांची सुरक्षा, भ्रष्टाचार, सरकारी पैशाची उधळपटटी, वाढती महागाई आणि बेरोजगारी यामुळे महायुती सरकारची नाचक्की झाली आहे. परिणामी पराभव समोर दिसत असल्याने विधानसभा निवडणूका पूढे ढकलण्याचे षडयंत्र आखले जात आहे, असे असले तरी यांनी कधीही निवडणूका घेऊ दया. काँग्रेस आणि महाविकास आघाडी २०० पेक्षा अधिक जागा जिंकेल असा विश्वास आमदार धिरज देशमुख यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केला. कोरोना सारख्या नैर्सगीक आपत्तीत महाविकास आघाडी सरकारने राज्यातील प्रत्येक नागरीकांची स्वताहाच्या कुटूंबातील सदस्या सारखी काळजी घेतली त्या तुलनेत विदयमान महायुतीचे सरकार जनतेला लुटण्याचे काम करीत आहे. त्यामुळे नागरीक दोन सरकाच्या कामगीरीची तुलना करतांना दिसत आहेत. महायुतीच्या सर्व्हेमध्ये हे सर्व दिसत असून आता निवडणूका झाल्या तर आपला पराभव निश्चीत आहे याची जाणीव महायुतीच्या नेत्याना झाली आहे म्यमुळे निवडणूका पूढे ढकलण्याचा त्याच प्रयत्न आहे असेही आमदार धिरज देशमुख यांनी म्हटले. ज्या कारखान्याकडून माझा सत्कार झाला तो कारखाना आदरणीय विलासराव देयामुख साहेंबाच्या नावे चालतो आहे. आई या कारखान्याच्या अध्यक्षा आहेत. आमदार अमित भैया संस्थापक आहेत त्यामुळे हा स्त्कार आशीर्वाद म्हणून स्विकारतो आहे. स्विकारलेला हा सन्मान मी काकांच्या चरणी समर्पीत करीत आहे असेही आमदार धिरज देशमुख यांनी म्हटले. तसेच यावेळी सभापती जगदीश बावणे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी कारखान्याचे संचालक सर्वश्री गोंविद बोराडे, अनंत बारबोले, भैरवनाथ सवासे, गुरूनाथ गवळी, बाळासाहेब बिडवे, नारायण पाटील, अमर मोरे, रंजीत पाटील, गोविंद डूरे, सुर्यकांत सुडे, अमृत जाधव, रामदास राऊत, सुभाष माने, भारत आदमाने, संजय पाटील खंडापूरकर, ज्ञानोबा पडीले यांच्यासह ऊस उत्पादक शेतकरी, वाहतूक ठेकेदार, तोडणी ठेकेदार मांजरा परिवारातील सर्व कारखान्याचे संचालक, खातेप्रमुख, अधिकारी, कामगार, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी आदरणीय विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पअर्पन केले, दिपप्रज्वलन केले, विषय पत्रिका वाचन कार्यकारी संचालक संजीव देसाई यांनी केले तर अहवाल वाचन व्हा.चेअरमन रविंद्र काळे यांनी केले, संचालक रणजित पाटील यांनी अनुमोदन दिले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन राहूल इंगळे पाटील यांनी तर आभार अमर मोरे यांनी मानले.

# पैनगंगा नदीवरील पुल पाण्यात ; नांदेड - किनवट माहूर रस्ता बंद

## ६ अधिक जनावरे वाहून गेली, घरांची पडझड, १६ अधिक गावांचा संपर्क तुटला

### पावसामुळे किनवट माहूर तालुक्यात मोठे नुकसान,

पावसाळ्याला सुरुवात झाल्यापासून शनिवारी दि.३१ पहिल्यांदाच झालेल्या जोरदार पावसामुळे किनवट माहूर रस्त्यावरील पैनगंगा नदी दुथडी भरून वहात आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास प्राची शक्यता निर्माण झाली आहे. सुरुवातीपासूनच ऑक्टोबर हीटसारखा उकाडा जाणवत असताना शनिवारी रात्री किनवट माहूर तालुक्यात मेघगर्जनेसह जोरदार पावसाला सुरूवात झाली. दमदार पावसाने रविवारी सकाळी पुन्हा हजेरी लावली. पावसाळ्याला सुरुवात होवून २ महिन्याचा कालावधी लोटत असताना शनिवारी रात्री बरसलेल्या मुसळधार पावसामुळे शहरालगतच्या पैनगंगेसह परिसरातील छोटे मोठे नाले, नद्या दुथडी भरून वहात आहेत. पावसाने घेतली नसल्याने पराची शक्यता असल्याने नदीकाठच्या लोकांनी सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे. दरम्यान, किनवट – माहूर तालुक्यात ढगफुटीसदृश झालेल्या पावसामुळे शेतीचे नुकसान झाले आहे. या नकसानीची त्वरित पाहाणी व पंचनामे करण्याची सूचना आमदार भीमराव केराम यांनी महसूल प्रशासनाला दिली आहे.





किनवट/शेख शौकत

गेल्या १८ तासापासून अतिवृष्टी सदृश्य मुसळधार सुरू असलेल्या पावसामुळे धनोडा केरोळी च्या मधून वाहणाऱ्या पैनगंगा नदीच्या पुलावरून पाणी जात असल्याने दि १ रोजी सकाळी १० वाजेपासून वाहतूक बंद असल्याने शेकडो वाहने अडकून पडली तर किनवट माहूर तालुक्यात अंतर्गत जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील नाले ओव्हर फ्लो झाल्याने तालुक्यातील अनेक गावांचा संपर्क तुटला. रविवारी रात्री उशीपर्यंत पुलावरील पाणी ओसरले नव्हते. वाहतुक ठप्पच होती. नुकसानीचे पंचनामे तात्काळ करण्याचे सुचना आमदार भिमराव केराम यांनी प्रशासनाला दिले आहे. किनवट माहूर तालुक्यातील नदीकाठच्या अनेक गावातील शेतशिवार पूर्णपणे खरडून गेले असून शेतकऱ्यांची जनावरे वाहून गेली आहेत खबरदारीचा उपाय म्हणून महागाव आणि महसूल विभाग नगरपंचायत आणि माहूर पोलिसांनी पुला काठच्या दोन्ही बाजूकडील वाहतूक बंद केली आहे. घरांची पडझड झाली तर शेत शिवारात तुडुंब पाणी भरल्याने ७५ अधिक टक्के शेत शेतातील पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे अनेक गावातील घरात पाणी शिरल्याने घरांचे अतोनात नुकसान झाले असून किनवट माहूर तालुक्यातील नदीकाठच्या अनेक गावातील शेतकऱ्यांची जनावरे वाहून गेली तर घरांची पडझड मोठ्या प्रमाणात झाली आहे जुन्या हडसणीला पुराच्या पाण्याने काही वेळ वेढा दिल्याने संपर्क तुटला होता तर नेर लांजी आणि अनेक परिसरातही नदीला जोडणारे नाले तुडुंब भरल्याने येथेही रहदार अडचण निर्माण झाली होती मौजे केरोळी फाट्यापासून रुई हडसनी ईवळेश्वर कुपटी जाणाऱ्या रस्त्यावर अनेक नाले तुटुंब भरल्याने १६ अधिक गावांचा संपर्क तुटला होता तसेच रुई गुंडवळ मार्ग तांदळाकडे जाणाऱ्या गरुड गंगा नाल्यावरील पुलावरून पाणी जात असल्याने गावांचाही संपर्क तुटला होता हरडफ गाव आणि तांड्याच्या मध्ये असलेल्या नाल्याला पूर आल्याने दोन्ही गावाचा संपर्क तुटून शेकडो घरात पाणी शिरल्याने प्रचंड नुकसान झाले तर परिसरातील अनेक गावातील नाल्या काठच्या शेतशिवारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती आहे.

# थाळी फेकमध्ये भारताला रौप्यपदक

पॅरिस : पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारताच्या खात्यात आणखी एक पदक जमा झाले असून थाळी फेकमध्ये योगेश कथुनियाने रौप्यपदक जिंकले आहे. त्याने पुरुषांच्या थाळी फेकमध्ये एफ५६ स्पर्धेत रौप्य पदक जिंकले. योगेश कथुनियाचा पहिला थ्रो ४२.२२ मीटर होता. यानंतर, दुसरा, तिसरा, चौथा आणि पाचवा अनुक्रमे ४१.५० मीटर, ४१.५५ मीटर, ४०.३३ मीटर आणि ४०.८९ मीटर होता. २७ वर्षीय योगेशने पहिल्याच प्रयत्नात ४२.२२ मीटर थाळी फेकली, जो त्याचा सर्वोत्तम प्रयत्न होता.



या स्पर्धेत ब्राझीलच्या बतिस्ता डॉस सँटोस क्लाउडनीने सुवर्णपदक जिंकले. त्याने ४६.८६ च्या सर्वोत्तम थ्रोसह ही कामगिरी केली. बॅटिस्टाचा हा थ्रो पॅरालिम्पिक खेळांच्या इतिहासातील या स्पर्धेतील सर्वोत्तम थ्रो ठरला. दुसरीकडे, ग्रीसच्या त्झोनिस कॉन्स्टँटिनोसने ४१.३२ मीटरच्या सर्वोत्तम थ्रोसह कांस्यपदक जिंकले. आज पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेच्या पाचव्या दिवशी योगेश कथुनियाने रौप्य पदक जिंकून इतिहास रचला. खरंतर, योगेश कथुनियाने यापूर्वी टोकियो ऑलिम्पिक २०२० मध्ये रौप्य पदक जिंकले होते. अशा प्रकारे त्याने सलग दुस–या पॅरालिम्पिक स्पर्धेत रौप्यपदक जिंकले आहे. भारतीय खेळाडूंनी आतापर्यंत १ सुवर्ण, ३ रौप्य पदके आणि ४ कांस्य पदके जिंकली आहेत.

# राष्ट्रपतीच्या दौऱ्यासाठी उदगीर नगरी सज्ज

## ४ सप्टेंबरला बुद्ध विहार उद्घाघटन व महिलांचा आनंद मेळावा







लातूर :– भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रथम आगमनासाठी ऐतिहासिक उदगीर नगरी सज्ज झाली आहे. चार तारखेला होणाऱ्या बुद्ध विहार उद्घाटन व महिलांच्या आनंद मेळाव्याची तयारी पूर्ण झाली असून उदयगिरी महाविद्यालयाच्या मैदानावर भव्य सभा मंडप उभा राहिला आहे. बुद्ध विहार लोकार्पणासाठी सज्ज असून आज पूर्ण परिस्थितीचा आढावा राज्याचे क्रीडामंत्री संजय बनसोडे व जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी घेतला.

राष्ट्रपती महोदयांचा महाराष्ट्राच्या दौऱ्याची आजपासून सुरुवात झाली आहे. बुद्धविहाराचे लोकार्पण व महिलांचा आनंद मेळावा नियोजित वेळेवर व्हावा, यासाठी प्रशासन ताकदीने कामाला लागले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लभार्थी महिलांचा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत राज्यातील पहिलाच कार्यक्रम या ठिकाणी होत आहे. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे, त्यांना पुरेशा सोयीसुविधा उपलब्ध करून रोजगार निर्मितीसाठी चालना देणे,महिलांना स्वावलंबी, आत्मनिर्भर बनवणे, यासाठी विविध शासकीय योजनांचीराज्यातप्रभावीअंमलबजावणीकरण्यातयेतआहे.यायोजनांचादुसराटप्पासुरूझालाआहे.

महाराष्ट्रात प्रथमतः या कार्यक्रमाला राष्ट्रपती उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या स्वागतासाठी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सामजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्यासह विविध मान्यवर उदगीरमध्ये पोहचत आहेत. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी आज या आयोजनाच्या शेवटच्या टप्प्यात सर्व कार्यक्रम स्थळांची पाहणी केली. राष्ट्रपतींचा हा पहिलाच उद्गित दौरा असून तो स्मरणीय बनावा यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहनही प्रशासनाने केले आहे. कार्यक्रमस्थळी विविध शासकीय विभागांच्या योजनांची माहिती देणारी दालने उभारण्यात येणार आहेत. आज या दालनाची ही पाहणी मान्यवरांनी केली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, महिला सन्मान योजना यासारख्या विविध योजनांमधील लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात राष्ट्रपतींच्या उपस्थितीत सन्मानित केले जाणार आहे. राष्ट्रपतींचा थेट संदेश ऐकण्याची संधी या कार्यक्रमात मिळणार असल्यामुळे या कार्यक्रमांची महिला जगतात प्रचंड उत्सुकता आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE